**आजचे पंचांग**

दिनांक : १ ऑगस्ट २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : तृतीया तिथी (रात्री ११:०७ पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी
नक्षत्र : शततारका नक्षत्र (रात्री ०८:४४ पर्यंत) त्यानंतर पूर्वाभाद्रपदा नक्षत्र
योग : शोभन योग (रात्री ११:२२ पर्यंत) त्यानंतर अतिगण्ड योग

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...






आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


# पंच कोणाचा? सरकारचा की संविधानाचा? सर्वोच्च न्यायालयाचा थेट सवाल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

देशातील सर्वात महत्त्वाची घटनात्मक संस्था म्हणजे निवडणूक आयोग. निवडणुका निष्पक्ष झाल्या, तर लोकशाही मजबूत राहते; पण निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरच प्रश्न उपस्थित झाले, तर लोकशाहीचा पाया हादरतो.

आता हा प्रश्न विरोधकांनी नव्हे, तर थेट सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये केलेला कायदा खरोखरच आयोगाला स्वतंत्र ठेवतो का? की सरकारलाच आपल्या पसंतीचे आयुक्त निवडण्याचा मार्ग मोकळा करून देतो? याच मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान केंद्र सरकारला कठोर प्रश्न विचारले.

या प्रकरणामागे अनेक वर्षांची पार्श्वभूमी आहे.

✻ २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने ऐतिहासिक निर्णय देत सांगितले होते की, संसदेने कायदा करेपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांच्या समितीने करावी. या निर्णयामागील उद्देश स्पष्ट होता सरकारचा एकतर्फी प्रभाव कमी करणे.

✻ मात्र त्यानंतर केंद्र सरकारने मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवा अटी आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ आणला. या कायद्यानुसार समितीतून सरन्यायाधीशांना वगळून त्यांच्या जागी केंद्रीय मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचा समावेश करण्यात आला.

✻ परिणामी निवड समितीत पंतप्रधान + केंद्रीय मंत्री असे



सरकारचे दोन सदस्य आणि फक्त एक विरोधी पक्षनेता अशी रचना झाली. टीकाकारांच्या मते, अशा परिस्थितीत सरकारचे मत सहज बहुमताने लागू शकते.

**निवडणूक आयोगावर यापूर्वीही अनेकदा निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.**

✻ विरोधकांनी अनेक निवडणुकांमध्ये आचारसंहितेच्या अंमलबजावणीतील दुहेरी निकष असल्याचा आरोप केला.

✻ काही प्रकरणांमध्ये तक्रारींवर उशिरा कारवाई, तर काहींमध्ये त्वरित निर्णय झाल्याने आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले.

✻ महाराष्ट्र, दिल्ली, पश्चिम बंगाल, कर्नाटक यांसारख्या राज्यांतील निवडणुकांदरम्यान आयोगाच्या निर्णयांवर राजकीय वाद निर्माण झाले.

✻ विशेषतः निवडणूक कार्यक्रम, प्रचारातील कथित उल्लंघने आणि तक्रारींच्या निकाली विलंब यांवरून आयोगाच्या स्वायत्ततेबाबत चर्चा रंगल्या.

हे आरोप सिद्ध झालेले नाहीत, परंतु अशा आरोपांमुळे आयोगावरील सार्वजनिक विश्वासाचा प्रश्न वारंवार ऐरणीवर आला आहे.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट संकेत दिले की,

✻ निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेची नियुक्ती प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असणे अत्यावश्यक आहे.

✻ जर नियुक्ती प्रक्रियेत सरकारचेच स्पष्ट बहुमत असेल, तर स्वायत्ततेबाबत नागरिकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते.

✻ लोकशाहीत केवळ निष्पक्षता पुरेशी नसते; निष्पक्षता दिसलीही पाहिजे, हा न्यायशास्त्रातील मूलभूत सिद्धांत न्यायालयाने अधोरेखित केला.

केंद्र सरकारचे म्हणणे आहे की, नियुक्तीची प्रक्रिया संसदेने कायद्याद्वारे निश्चित केली असून ती संविधानाच्या चौकटीत आहे. सरकारच्या मते, निवड समितीची रचना हा विधिमंडळाचा धोरणात्मक निर्णय आहे आणि त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करू नये.

## सारांश वृत्त

### नऱ्हे भागात महापालिकेकडून 'कचरायुक्त' गढूळ पाण्याचा पुरवठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे भागात गेल्या काही दिवसांपासून पुणे महानगरपालिकेकडून अत्यंत गढूळ आणि दूषित पाण्याचा पुरवठा केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या पाण्याचे कोणतेही निर्जंतुकीकरण न करताच ते थेट नागरिकांच्या घरांपर्यंत पोहोचवले जात असल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभारामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले असून, परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नऱ्हे आणि परिसरातील सोसायट्या तसेच लहान वस्त्यांमध्ये नळाला येणारे पाणी चिखलमय आणि दुर्गंधीयुक्त आहे. पाणी गाळून किंवा उकळून पिण्यापलीकडे गेले आहे. दूषित पाण्यामुळे गेल्या आठवड्याभरात बालकांपासून ते वृद्धांपर्यंत अनेकांना उलट्या, जुलाब, गॅस्ट्रो आणि पोटाच्या गंभीर विकारांना सामोरे जावे लागत आहे. स्थानिक खासगी रुग्णालयांमध्ये दूषित पाण्यामुळे आजारी पडलेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. स्थानिकांचा आंदोलनाचा इशारास्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या गंभीर समस्येबाबत महापालिकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयात वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, अधिकाऱ्यांकडून केवळ पोकळ आश्वासने दिली जात असून, प्रत्यक्ष कृती शून्य आहे. महापालिकेने तत्काळ या समस्येची दखल घेऊन पाण्याचे योग्य निर्जंतुकीकरण करूनच शुद्ध पाणीपुरवठा सुरू करावा. जर येत्या दोन दिवसात स्वच्छ पाणी मिळाले नाही, तर नऱ्हे भागातील संतप्त नागरिक महापालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून पाणी वितरणापूर्वी त्यावर योग्य प्रक्रिया करणे आणि क्लोरिनेशन करणे बंधनकारक आहे. मात्र, नऱ्हे भागातील पाण्याच्या दुर्गंधीवरून आणि रंगावरून पालिका प्रशासन कोणतीही प्रक्रिया न करता थेट जलवाहिन्यांमध्ये पाणी सोडत असल्याचे उघड होत आहे. पावसाळ्याच्या दिवसांत जलजन्य आजारांचा धोका अधिक असतानाही, आरोग्य आणि पाणीपुरवठा विभागाचे याकडे झालेले दुर्लक्ष म्हणजे आमच्या जिवाशी खेळण्याचाच प्रकार आहे.

## सत्तेला थेट आव्हान! 'कॉकरोच जनता पार्टी' निवडणूक लढवणार नाही, पण सरकारला जाब विचारणारा 'राजकीय दबाव गट' बनणार; अभिजीत दीपके यांचा एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**संभाजीनगर । वृत्तसंस्था**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून देशभर चर्चेत आलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) ने आता आपल्या पुढील राजकीय वाटचालीबाबत मोठी घोषणा केली आहे. संघटनेचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी स्पष्ट केले की, सीजेपीचे राजकीय पक्षात रूपांतर होणार नसून ती सरकारवर सातत्याने दबाव निर्माण करणारा 'राजकीय दबाव गट' म्हणून काम करणार आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही भूमिका मांडली.

सोनम वांगचुक यांच्याशी मतभेद झाल्याच्या चर्चाही दीपके यांनी फेटाळून लावत, हे आंदोलन सोनम वांगचुक यांच्या बलिदानाशिवाय पूर्णच होऊ शकले नसते, असे स्पष्ट केले. त्यांच्या मते, २६ दिवसांच्या उपोषणामुळेच देशभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरले आणि सरकारवर दबाव निर्माण झाला. त्यांच्या उपोषणाशिवाय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा शक्य झाला नसता, असा दावाही त्यांनी केला.

मात्र, उपोषणादरम्यान भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांना सोनम वांगचुक यांची भेट घेण्याची परवानगी मिळाली, पण स्वतःला आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांना ती नाकारण्यात आल्याचा आरोप करत दीपके यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यांनी दावा केला की, सोनम वांगचुक यांना एकप्रकारे सरकारने अलिप्त ठेवले होते, तर आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारासाठी भाजपाशी संबंधित गुंड जबाबदार होते, असाही गंभीर आरोप त्यांनी केला. या आरोपांबाबत भाजपकडून अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. दीपके यांनी स्पष्ट केले की, सीजेपीची पुढील लढाई केवळ शिक्षणापुरती मर्यादित राहणार नाही. बेरोजगारी, आर्थिक विषमता, प्रशासनातील उत्तरदायित्व आणि लोकशाही संस्थांवरील ढासळता विश्वास या मुद्द्यांवरही संघटना देशव्यापी मोहिमा राबवणार आहे. लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण करणे हेच आमचे पुढील उद्दिष्ट आहे, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थी आंदोलनातून उभी राहिलेली ही संघटना आता निवडणुकीच्या मैदानात न उतरता, सत्तेला प्रश्न विचारणारा आणि सार्वजनिक धोरणांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणारा संघटित राजकीय दबाव गट म्हणून स्वतःची नवी भूमिका निश्चित करत असल्याचे या घोषणेतून स्पष्ट झाले आहे.

## एल निनोचा इशारा धोक्याच्या पातळीवर! ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये अतितीव्र रूप; शेती, पाणी आणि अर्थव्यवस्थेवर संकटाचे ढग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

देशासमोर हवामानाशी संबंधित मोठे संकट उभे राहण्याची शक्यता केंद्र सरकारनेच व्यक्त केली आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ दरम्यान एल निनो अतितीव्र (Super El Ni0o) श्रेणीत पोहोचू शकतो, अशी माहिती विज्ञान व तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत लेखी उत्तराद्वारे दिली. विषुववृत्तीय मध्य प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठावरील तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने एल निनोची तीव्रता वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जून २०२६ मध्ये एल निनो कमकुवत अवस्थेत होता, मात्र जुलैमध्ये तो मध्यम श्रेणीत पोहोचला असून, वर्षाअखेरीस तो अतितीव्र स्वरूप धारण करण्याची शक्यता आहे. मात्र, भारतावर त्याचा नेमका परिणाम केवळ एल निनोवर अवलंबून नसून समुद्र आणि वातावरणातील इतर हवामान प्रक्रियांवरही अवलंबून असेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभाग एल निनोसह इतर हवामान नियंत्रक घटकांवर सातत्याने लक्ष ठेवत असून, केंद्र व राज्य सरकारांना हंगामी, मासिक आणि विस्तारित कालावधीचे अंदाज तसेच आवश्यक सल्ले नियमितपणे दिले जात आहेत. संभाव्य परिणाम लक्षात घेता शेती, जलसाठे आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी वेळेत नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

## 'राम' नावाने दान, 'कोणाच्या' खिशात मान? संसदेत प्रतीकात्मक आंदोलनातून विरोधकांचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराच्या आरोपांवर संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी शुक्रवारी अनोख्या आणि लक्षवेधी पद्धतीने आंदोलन करत केंद्र सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. संसद परिसरात उभारलेल्या प्रतीकात्मक दानपेटीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पैसे टाकले, तर अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी पुजाऱ्याच्या वेशात त्या दानपेटीतील पैसे पुन्हा स्वतःच्या खिशात ठेवत कथित गैरव्यवहाराचे प्रतीकात्मक सादरीकरण केले. या आंदोलनाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला.

समाजवादी पक्ष, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात चोर-चोर आणि चंदा चोर अशा घोषणाबाजी करत राम मंदिरातील कथित देणगी प्रकरणावर संसदेत सविस्तर चर्चा आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली. समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी दानपेटी ठेवली, तर अनेक विरोधी खासदारांनी त्यात प्रतीकात्मक देणगी दिली.

फैजाबादचे खासदार अवधेश प्रसाद यांनी हा मुद्दा अयोध्येतील जनतेच्या भावनांशी संबंधित असल्याचे सांगत संसदेत तो ठामपणे मांडण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजवादी पक्षाचे खासदार धर्मेंद्र यादव यांनी मंदिरातील देणगी व्यवस्थापनावर गंभीर आरोप करत, अनेक भाविकांना पावत्या न देणे, दानपेटीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच पैसे घेणे, तसेच सीसीटीव्ही फुटेज हटविल्याचा दावा केला. त्यांनी राम मंदिरासाठी जमा झालेल्या निधीचा गैरवापर झाल्याचाही आरोप केला.

या सर्व आरोपांवर भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद किंवा राम मंदिर प्रशासनाकडून या वृत्तानुसार अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तसेच या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

राम मंदिरातील कथित देणगी प्रकरणासोबतच विरोधकांनी दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावर झालेल्या पोलिस कारवाईचाही मुद्दा उपस्थित करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. संसद परिसरातील हे प्रतीकात्मक आंदोलन राजकीय वातावरण अधिक तापवणारे ठरले.

## 'तुम्ही भाजपाकडून आलात का?' जखमी पोलिसांच्या नातेवाईकांच्या प्रश्नाबाबत विचारणाऱ्या पत्रकाराला राहुल गांधींनी फटकारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि जंतर मंतर येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेला लाठीमार हे मुद्दे सध्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गाजत आहेत. यादरम्यान, आज संसदेबाहेर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि एका पत्रकारामध्ये झालेला सवाल जबाब चर्चेचा विषय ठरला आहे. या पत्रकारानेराहुल गांधी यांना जंतर मंतर येथे आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झटापटीत जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या मागणीबाबत प्रश्न विचारला. तेव्हा वैतागलेल्या राहुल गांधी यांनी तुम्ही भाजपाडून आला आहात का? असा प्रतिप्रश्न विचारला.

दिल्लीतील जंतर मंतर येथून संसदेकडे निघालेल्या मोर्चाला रोखताना पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केला होता. तसेच या झटापटीत काही पोलीसही जखमी झाले होते. या जखमी झालेल्या पोलिसांच्या नातेवाईकांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधत आपल्या मागण्या मांडल्या होता. तसेच संसद भवनासमोर पोलीस कर्मचाऱ्यांवर झालेला हल्ला आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आलेल्या अडचणींचा प्रश्नही उपस्थित करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, संसद भवन परिसरात प्रवेश करत असलेल्या राहुल गांधी यांना गाठत एका पत्रकाराने विरोधी पक्ष जखमी पोलीस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रश्नांबाबत संसदेत आवाज उठवणार का, असे विचारले. तेव्हा राहुल गांधी यांनी या प्रश्नाला कुठलेही उत्तर न देता राहुल गांधी यांनी तुम्ही भाजपाकडून आला आहात का? असा प्रतिप्रश्न विचारला.

## वृत्तपत्रांवरच बचतीची कात्री; उधळपट्टी कायम, सरकारचा निर्णय म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर घाला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

खर्चकपातीच्या नावाखाली मंत्री, राज्यमंत्री आणि त्यांच्या शासकीय कार्यालये तसेच निवासस्थानी छापील वृत्तपत्रांच्या खरेदीवर निर्बंध घालण्याचा राज्य सरकारचा निर्णय आता तीव्र वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी या निर्णयावर जोरदार हल्लाबोल करत, हा केवळ खर्च कमी करण्याचा निर्णय नसून छापील माध्यमे, वाचन संस्कृती आणि लोकशाहीच्या माहिती व्यवस्थेवर घातलेला आघात असल्याचा आरोप केला आहे.

देशमुख यांनी सरकारच्या भूमिकेवर उपरोधिक टीका करत, दात टोकरून पोट भरत नाही या मराठी म्हणीचा उल्लेख केला. मंत्र्यांच्या कार्यालयांतील काही वर्तमानपत्रे बंद करून सरकार मोठी आर्थिक बचत करीत असल्याचा आभास निर्माण केला जात आहे. मात्र, हजारो कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात या खर्चाचे प्रमाण किती आहे, याचे उत्तर सरकारने जनतेसमोर द्यावे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकारने मंत्री आणि राज्यमंत्र्यांना छापील वृत्तपत्रांऐवजी ऑनलाइन आवृत्त्या वाचण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, ही भूमिका प्रत्यक्ष परिस्थितीपासून दूर असल्याचे पत्रकार परिषदेचे म्हणणे आहे. मंत्री स्वतः सर्व वृत्तपत्रे वाचत नसले तरी त्यांच्या कार्यालयात येणारे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांच्यासाठी ही वृत्तपत्रे माहितीचा महत्त्वाचा स्रोत असतात. एकच छापील वर्तमानपत्र अनेकांच्या वाचनासाठी उपयोगी पडते, ही वस्तुस्थिती सरकारने दुर्लक्षित केल्याची टीका करण्यात आली.

मराठी पत्रकार परिषदेच्या मते, हा निर्णय स्वतंत्रपणे पाहण्याचा विषय नसून गेल्या काही वर्षांत छापील माध्यमांवर आलेल्या विविध आर्थिक निर्बंधांच्या मालिकेतील आणखी एक टप्पा आहे. सरकारी जाहिरातींमध्ये सातत्याने कपात, जाहिरातींचे दर वाढविण्याच्या मागण्यांकडे दुर्लक्ष आणि आता थेट वृत्तपत्र खरेदीवर निर्बंध अशा निर्णयांमुळे छापील पत्रकारितेला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा गंभीर आरोप देशमुख यांनी केला.

यामुळे केवळ वृत्तपत्र उद्योगच नव्हे, तर वृत्तपत्र विक्रेते, वितरण व्यवस्था आणि पत्रकारितेवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांवर परिणाम होणार असल्याची भीतीही व्यक्त करण्यात आली. या निर्णयाचा वृत्तपत्र विक्रेते आणि विविध पत्रकार संघटनांनीही विरोध केला असून सरकारने तातडीने निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

देशमुख यांनी सरकारला पर्यायी खर्चकपातीचे मार्गही सुचविले आहेत. बचत करायची असेल तर मंत्र्यांच्या ताफ्यातील अनावश्यक वाहनांचा वापर कमी करावा, अतिरिक्त सुरक्षा व्यवस्थेचा फेरआढावा घ्यावा, अनुत्पादक शासकीय खर्चावर नियंत्रण आणावे आणि प्रशासनातील उधळपट्टी रोखावी. ज्ञान, माहिती आणि वाचनाशी संबंधित खर्च कमी करून आर्थिक शिस्त प्रस्थापित होत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या मते, वाचन संस्कृती जपणे आणि माहितीची मुक्त उपलब्धता सुनिश्चित करणे ही कोणत्याही लोकशाही सरकारची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत छापील वृत्तपत्रांवर निर्बंध घालण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक नसून लोकशाही मूल्यांशी विसंगत असल्याचा दावा त्यांनी केला.

मराठी पत्रकार परिषदेने सरकारला निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करण्याचे आवाहन केले असून मंत्री, राज्यमंत्री आणि सर्व शासकीय कार्यालयांमध्ये छापील वृत्तपत्रांची उपलब्धता पूर्ववत ठेवण्याची मागणी केली आहे.

## संपादकीय

### धर्म वैयक्तिक, राष्ट्र सर्वांचे; मग तरुणांना अजूनही धर्म आणि राष्ट्रवादाच्या नावावर का विभागले जाते?

भारतातील ऋशप न धर्मापासून दूर जात आहे, अशी भीती काही जण व्यक्त करतात. तर काहींना हीच पिढी कट्टर धार्मिक होत असल्याचे चित्र दिसते. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. आजचा तरुण धर्म सोडत नाही, तो धर्माचा अर्थ बदलत आहे. तो राष्ट्रवाद नाकारत नाही, तर राष्ट्रवादाची नव्याने व्याख्या करत आहे. प्रश्न इतकाच आहे की, समाज, सरकार, धार्मिक संस्था आणि राजकीय पक्ष या बदलाला समजून घेण्यास तयार आहेत का? आज भारतातील तरुणाला मंदिर, मशीद, गुरुद्वारा किंवा चर्चपेक्षा रोजगार, शिक्षण, मानसिक आरोग्य, तंत्रज्ञान, हवामान बदल आणि समान संधी यांचे प्रश्न अधिक अस्वस्थ करतात. तरीही सार्वजनिक चर्चेत त्याला पुन्हा पुन्हा धर्माच्या आणि ओळखीच्या चौकटीतच का अडकवले जाते?

भारतातील कोट्यवधी Gen Z तरुणांमध्ये देवावरील श्रद्धा कायम आहे. अनेक अभ्यास दर्शवतात की तरुण प्रार्थना करतात, ध्यान करतात आणि अध्यात्मातून मानसिक स्थैर्य शोधतात. एका अभ्यासानुसार सुमारे ६२ टक्के भारतीय ऋशप न युवकांनी अध्यात्मामुळे मानसिक स्पष्टता आणि भावनिक आधार मिळतो, असे नमूद केले आहे. पण त्याच वेळी ही पिढी धार्मिक संस्थांना प्रश्न विचारते. आणि इथेच संघर्ष सुरू होतो.

धर्माला प्रश्न विचारणे म्हणजे धर्मविरोध आहे का? विवेकाची मागणी करणे म्हणजे श्रद्धेचा अपमान आहे का? सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहिला तर प्रत्येक परिवर्तन प्रश्न विचारणाऱ्यांनीच घडवले आहे. मग आजचा युवक प्रश्न विचारतो तेव्हा त्याला संस्कृतीविरोधी ठरवण्याची घाई का केली जाते?

राजकीय पक्षांची भूमिकाही याहून वेगळी नाही. निवडणुका जवळ आल्या की युवकांना रोजगाराच्या आकडेवारीपेक्षा धार्मिक ध्रुवीकरणाच्या चर्चेत अडकवले जाते. बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, कौशल्य विकास, महागाई, डिजिटल अर्थव्यवस्था किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बदलणाऱ्या रोजगार बाजारावर ठोस चर्चा कमी; पण धर्माच्या नावावर भावना पेटवण्याची स्पर्धा मात्र कायम. हा योगायोग आहे की ठरवून आखलेले राजकारण?

राष्ट्रवादाचाही अर्थ बदलत आहे. आजचा युवक राष्ट्रप्रेमाला घोषणांमध्ये नव्हे, तर संविधानाचा सन्मान, सार्वजनिक संस्थांवरील विश्वास, सामाजिक सलोखा आणि जबाबदार नागरिकत्वात पाहतो. पण दुर्दैवाने सार्वजनिक चर्चेत राष्ट्रवाद अनेकदा मतभेद दडपण्याचे किंवा टीकाकारांना देशविरोधी ठरवण्याचे साधन बनतो. लोकशाहीत सरकारवर प्रश्न विचारणे हे देशविरोधी नसून लोकशाहीचे कर्तव्य आहे, हे आपण विसरत चाललो आहोत का? सोशल मीडियाने या संघर्षाला आणखी गुंतागुंतीचे केले आहे. अल्गोरिदम संतुलित विचारांपेक्षा टोकाचे मत अधिक वेगाने पसरवतात. द्वेष, अफवा आणि धार्मिक ध्रुवीकरणाला लाखो व्ह्यूज मिळतात; पण संवाद, विवेक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला तितकीच जागा मिळते का? युवकांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या या डिजिटल परिसंस्थेची जबाबदारी कोण घेणार? धार्मिक संस्थांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. युवकांना फक्त आज्ञाधारक अनुयायी म्हणून पाहण्याची मानसिकता बदलावी लागेल. त्यांना प्रश्न विचारू द्या, चर्चा करू द्या, मतभेद मांडू द्या. श्रद्धा भीतीवर नव्हे, तर विश्वासावर टिकते. प्रश्नांना बंदी घालणारा धर्म नव्हे, तर संवाद स्वीकारणारा धर्मच पुढील पिढीला आपलासा वाटेल.

सरकारनेही तरुणांच्या आकांक्षा ओळखल्या पाहिजेत. धर्म आणि राष्ट्रवाद हे समाजजीवनातील महत्त्वाचे घटक आहेत; परंतु ते रोजगार, शिक्षण, आरोग्य, संशोधन, नवोन्मेष आणि सामाजिक न्याय यांची जागा घेऊ शकत नाहीत. तरुणांना घोषणांपेक्षा संधी हव्या आहेत. त्यांना भावनिक ध्रुवीकरणापेक्षा भविष्याची हमी हवी आहे.

Gen Z धर्म नाकारत नाही; ती अंधानुकरण नाकारते. ती राष्ट्रवाद नाकारत नाही; ती द्वेषावर उभा राहिलेला राष्ट्रवाद नाकारते. ती भारतीय परंपरेचा सन्मान करते; पण त्या परंपरेला विवेक, विज्ञान आणि संविधानिक मूल्यांच्या कसोटीवरही पाहते. ही पिढी प्रश्न विचारते, कारण तिला उत्तरांची अपेक्षा आहे शत्रू निर्माण करण्याची नाही. आज सर्वात मोठा प्रश्न असा आहे की भारताला विचार करणारे नागरिक हवे आहेत की फक्त घोषणा देणारे अनुयायी? कारण मजबूत राष्ट्राची निर्मिती धर्माच्या नावावर समाज विभागून होत नाही; ती समान संधी, न्याय, वैज्ञानिक दृष्टी, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांवर उभी राहते. जर राजकारण, धार्मिक संस्था आणि शासन यांनी हा संदेश वेळेत समजून घेतला नाही, तर Gen Z त्यांना नाकारेलच असे नाही; पण त्यांच्यापासून शांतपणे दूर जाईल. आणि हा बदल कोणत्याही निवडणुकीपेक्षा अधिक मोठा सामाजिक बदल ठरेल.

# थेरगावात घाणीचे साम्राज्य; स्मार्ट सिटीच्या दाव्याला तडा, प्रशासनासह नागरिकांची जबाबदारीही ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

स्मार्ट सिटी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात पुन्हा एकदा कचऱ्याची गंभीर समस्या समोर आली आहे. कावेरी नगर सबवे, ग क्षेत्रीय कार्यालयासमोरील परिसर आणि संतोषनगर बीआरटी बसस्टॉप परिसरात रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचल्याने दुर्गंधी, अस्वच्छता आणि रोगराईचा धोका वाढला आहे. मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतरही शहरातील कचरा व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने धडा घेतला का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

कावेरी नगर सबवे : रात्री कचरा, दिवसा नागरिकांची गैरसोय

कावेरी नगर सबवे परिसरात रात्रीच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्याचे दिसून येत आहे. परिणामी सकाळी शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदारांना दुर्गंधीयुक्त वातावरणातून प्रवास करावा लागत आहे. परिसरात मोकाट कचऱ्यामुळे डास, माशा आणि रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत असून स्वच्छतेच्या नियमांचे खुलेआम उल्लंघन होत असल्याचे चित्र आहे.

ग क्षेत्रीय कार्यालयासमोरच कचऱ्याचे ढीग

महानगरपालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयासमोरील रस्त्यावरच कचऱ्याचे ढीग साचल्याने प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महानगरपालिकेच्या कार्यालयासमोरच अशी परिस्थिती असेल, तर शहरातील इतर भागांची अवस्था काय असेल? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. काही उच्चभ्रू गृहनिर्माण संस्थांसमोरही कचरा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

संतोषनगर बीआरटी बसस्टॉप : प्रवाशांचा जीव मेटाकुटीला

संतोषनगर बीआरटी बसस्टॉप परिसरात बसथांबा आणि मुख्य रस्त्यावर कचरा साचल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. दुर्गंधीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून अस्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नागरिकांचाही बेजबाबदारपणा कारणीभूत

महानगरपालिकेची कचरा संकलन गाडी नियमित येत असतानाही काही नागरिक सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे केवळ प्रशासनालाच दोष देऊन चालणार नाही, तर स्वच्छ शहरासाठी नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखणे तितकेच आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या

* सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.
* कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी.
* स्वच्छता नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी.
* संवेदनशील ठिकाणी नियमित साफसफाईसाठी विशेष पथके नियुक्त करावीत.
* स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवून नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करावी.

स्वच्छ शहर ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांची शिस्त या दोन्हींच्या समन्वयातूनच पिंपरी-चिंचवडची 'स्मार्ट सिटी'ची ओळख टिकून राहू शकते.

## विद्यार्थ्यांनी पदवीसोबत जागतिक दर्जाचे एव्हिएशन कौशल्य आत्मसात करावे – अभिषेक बारणे




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवण्यावर भर न देता, बदलत्या काळानुसार एव्हिएशन क्षेत्रातील जागतिक दर्जाचे व्यावसायिक कौशल्य आत्मसात करून रोजगारक्षम बनावे, असे आवाहन अभिषेक बारणे यांनी केले.

एव्हिएशन क्षेत्रात करिअरच्या वाढत्या संधी लक्षात घेता तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

योग्य कौशल्ये आणि आधुनिक प्रशिक्षणाच्या बळावर भारतीय युवक जागतिक विमान वाहतूक उद्योगात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेतील ३५ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : प्रतिनिधी ।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून जुलै २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या २१ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १४ अशा एकूण ३५ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमाला जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी-चिंचवड कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, नंदकुमार इंदलकर, मुख्य लिपिक माया वाकडे, विविध विभागांतील कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यामध्ये लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता, मुख्याध्यापक, कार्यालय अधीक्षक, उपशिक्षक, उद्यान निरीक्षक, सर्व्हेअर, सुरक्षा कर्मचारी, सफाई कर्मचारी आदी विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश होता. ०कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर आभार माया वाकडे यांनी मानले.

## पिंपरी-चिंचवड लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी आमदार शंकर जगताप यांचा 'मास्टर प्लॅन'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वीज मागणी लक्षात घेऊन अखंडित वीजपुरवठ्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी महावितरणच्या 'प्रकाश भवन' येथे महापारेषण व महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. बैठकीत वीज प्रकल्पांना कालबद्ध गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत पिंपरी-चिंचवड, राजगुरुनगर आणि लोणावळ्यासाठी स्वतंत्र वीज परिमंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव, पाषाण-सांगवी वीजवाहिनीचे काम पुढील सहा महिन्यांत सुरू करणे, गहुंजे येथील २२०/२२ केव्ही उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती, तसेच रावेत, पुनावळे, किवळे व ताथवडे परिसरातील भविष्यातील वीज पायाभूत सुविधांचे नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.



याशिवाय मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या, पूरप्रवण भागातील ट्रान्सफॉर्मर सुरक्षित ठिकाणी स्थलांतर, महापालिकेसोबत संयुक्त समन्वय यंत्रणा, धोकादायक वीजयंत्रणांची तातडीने दुरुस्ती आणि नियमित ग्राहक मेळावे आयोजित करण्याचे निर्देशही देण्यात आले.

यावेळी आमदार शंकर जगताप यांनी, पिंपरी-चिंचवडचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता शहराला अखंडित व सक्षम वीजपुरवठा देणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करून पिंपरी-चिंचवड पूर्णपणे लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्यात येत आहे, असे सांगितले.

# सायबर गुन्हेगारांचे 'बँक खाते' भाड्याने देणारे रॅकेट उद्ध्वस्त!

## निगडी पोलिसांची मोठी कारवाई; ३० लाखांहून अधिकच्या सायबर फ्रॉडचा भांडाफोड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चिंचवड : प्रतिनिधी**

आपले बँक खाते सायबर गुन्हेगारांना वापरण्यास देऊन देशभरातील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीवर निगडी पोलिसांनी मोठी धडक कारवाई केली आहे. या प्रकरणात वेदांत अनिल कुडळे (वय २०, रा. आकुर्डी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काय आहे प्रकार?

आरोपीने बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्याचा वापर करून सायबर गुन्हेगारांच्या टोळीशी हातमिळवणी केली. या खात्याद्वारे सुमारे ३० लाख ०२ हजार ७४२ रुपयांचे संशयास्पद आर्थिक व्यवहार झाले असून, देशभरातील नागरिकांकडून २६ लाख २-४ हजार रुपये हडपल्याचे निष्पन्न झाले आहे.

**इथे गाडी का लावली?' किरकोळ कारणावरून पिंपरीत वृद्धाला विटेने बेदम मारहाण**

पिंपरी:

दारासमोर गाडी का लावली, या क्षुल्लक कारणावरून चिडलेल्या एका ५५ वर्षीय व्यक्तीने शेजाऱ्याच्या डोक्यात मातीची भाजलेली वीट मारून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना पिंपरीतील सत्यनारायण मंदिराजवळ घडली आहे.

आरोपीवर गुन्हा दाखल:

पवन पुरुषोत्तम गिडवाणी (वय २२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अशोक परमानंद धणवाणी (वय ५५) याच्याविरुद्ध पिंपरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरकोळ वादातून अशोक याने शिवीगाळ करत रस्त्यावरील वीट उचलून थेट तक्रारदाराच्या वडिलांच्या डोक्यात मारली.

**हातउसने दिलेले पैसे मागितल्याने तरुणावर वार; आळंदीतील धक्कादायक प्रकार**

पिंपरी-चिंचवड: हातउसने दिलेले पैसे परत मागितल्याचा राग मनात धरून दोन आरोपींनी एका तरुणावर चाकूने वार करत, लाकडी दांडक्याने गंभीर मारहाण केल्याची घटना आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

पैसे मागितले अन् चाकूने वार केला! मिळालेल्या माहितीनुसार, आळंदी-मरकळ रस्ता परिसरात तक्रारदार महादेव परमेश्वर कांबळे यांनी आरोपी आर्यन नाना फुलगे (वय २२) याला हातउसने दिलेले पैसे परत मागितले.

यावरून चिडून जाऊन आरोपी आर्यन याने तक्रारदाराच्या पोटावर व मानेवर चाकूने वार केले, तर त्याचा साथीदार समाधान प्रकाश फुलगे (वय २१) याने लाकडी दांडक्याने डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले.

या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०९(१), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक गिरीगोसावी अधिक तपास करत आहेत.

## कागदोपत्री पाऊस, प्रत्यक्षात दुष्काळी झळा; इंदापूरमध्ये खरीप पेरणी फक्त ६५ टक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर : प्रतिनिधी**

पेरणीचा मुख्य हंगाम असलेल्या जून आणि जुलै महिन्यात पावसाने दिलेल्या सततच्या हुलकावणीमुळे इंदापूर तालुक्यातील बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. दोन महिन्यांत तब्बल २६ दिवस पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला असून, तालुक्यातील खरीप पेरणी केवळ ६५ टक्क्यांवरच थांबली आहे. उर्वरित ३५ टक्के क्षेत्र अद्याप पेरणीविना असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

जून महिन्यात तालुक्यात १०४.७ मिमी पावसाची नोंद झाली. मात्र, हा पाऊस काही मोजक्याच दिवसांत पडला. महिन्यात तब्बल १६ दिवस पाऊसच झाला नाही. विशेष म्हणजे १० ते २२ जूनदरम्यान सलग १३ दिवस पावसाने दडी मारल्याने उगवलेली पिके करपू लागली. जूनमध्ये ९ जून रोजी सर्वाधिक २७.३ मिमी पाऊस झाला.

जुलै महिन्यातही परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. ३१ जुलैअखेर ८४.५ मिमी पावसाची नोंद झाली असली, तरी महिन्यात केवळ आठ दिवसच समाधानकारक पाऊस झाला. १० ते १६ जुलैदरम्यान सलग सात दिवस पावसाचा खंड पडला, तर एकूण १० दिवस पूर्णपणे कोरडे गेले. महिन्यातील सर्वाधिक २४.७ मिमी पाऊस ३१ जुलै रोजी नोंदविण्यात आला. कृषी विभागाच्या माहितीनुसार, तालुक्यात मक्याची पेरणी सर्वाधिक ८,३२६.६० हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. त्यानंतर बाजरी, तूर, उडीद, सोयाबीन, मूग, कापूस, सूर्यफूल व भुईमूग या पिकांची लागवड झाली असली, तरी पावसातील अनियमिततेचा सर्वाधिक फटका मका, मूग, उडीद आणि तूर पिकांना बसला आहे. अनेक ठिकाणी कोवळी पिके सुकू लागली असून, दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे.

पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाचा ताण आल्याने यंदा उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. ऑगस्ट महिन्यात नियमित पाऊस झाला नाही, तर उर्वरित ३५ टक्के क्षेत्र रब्बी हंगामापर्यंत पडीक राहण्याची भीती आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# खडकवाडी–पोंदेवाडी मार्गे लोणी–मंचर एसटी सेवा पूर्ववत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील खडकवाडी–पोंदेवाडी मार्गे धावणारी लोणी–मंचर एसटी बस सेवा पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने कोणतीही पूर्वसूचना न देता ही बस सेवा बंद केल्याने विद्यार्थी, नोकरदार तसेच ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली होती. यामुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

या संदर्भात खडकवाडीचे माजी सरपंच अनिल डोके व ग्रामस्थांनी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन समस्या मांडली. वळसे पाटील यांनी तत्काळ संबंधित एसटी डेपो प्रशासनाशी संपर्क साधून बस सेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर बंद करण्यात आलेली एसटी सेवा पुन्हा सुरू करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, खडकवाडी–पोंदेवाडी घाटातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झाडांच्या फांद्या व झुडपे पडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव या मार्गावरील एसटी सेवा तात्पुरती बंद करण्यात आली होती. त्यानंतर ग्रामस्थांच्या सहकार्याने व वन विभागाच्या परवानगीने रस्त्यावरील झाडांच्या फांद्या व झुडपे हटविण्यात आली. अडथळा दूर झाल्यानंतर एसटी बस सेवा पूर्ववत सुरू करण्यात आली.

बस सेवा पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. तसेच ग्रामस्थांच्या वतीने एसटीचे चालक आणि वाहक यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी एकनाथ सुक्रे, श्रीराम वाळुंज, आदिनाथ सुक्रे, उदय डोके, पांडुरंग सुक्रे, कमल सुक्रे, संपत डोके, भीमराव वाळुंज, रामदास सुक्रे, नाथा सुक्रे, गुलाब सुक्रे, देवराम वाळुंज, विकास डोके, बाळासाहेब धुमाळ, गोटीराम रणदिवे, तुकाराम वाळुंज, विठ्ठल सुक्रे, महादू सुक्रे आदी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### पुणे पालिकेने नाममात्र भाड्याने दिलेल्या मिळकतीची कुंडली तयार करणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिका मालकीच्या मिळकती नाममात्र भाड्याने घेऊन २००८ पूर्वी राजकीय नेते, त्यांचे निकटवर्तीय, तसेच विविध सामाजिक संस्थांनी या जागा व्यावसायिक वापरासाठी भाड्याने दिल्या आहेत. सामाजिक उपक्रमांसाठी ३० ते ९९ वर्षांच्या कराराने या मिळकती दिलेल्या आहेत. मात्र, त्यातून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळविले जात आहे. अशा मिळकतींची कुंडली महापालिकेच्या वतीने तयार केली जाणार आहे.

महापालिकेच्या ताब्यात आलेल्या मिळकतींच्या सातबारा नोंदी पूर्ण करणे आणि जुन्या मिळकतींचा शोध घेण्यासाठी महसूल विभागातील माजी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

या चर्चेदरम्यान नगरसेवक अजय खेडेकर यांनी २००८ पूर्वी भाडेकराराने दिलेल्या अनेक जागांची करारमुदत संपूनही त्या महापालिकेच्या ताब्यात घेतल्या नसल्याची तक्रार केली. अनेक मिळकतींची करारपत्रे गायब असून, त्या बिनदिक्कतपणे व्यावसायिक कारणांसाठी वापरल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काही मिळकतींसंदर्भात गेल्या तीन वर्षांपासून माहिती मागवूनही प्रशासन ती उपलब्ध करून देत नसल्याची बाबही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर सर्वपक्षीय नगरसेवकांनी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे सांगत, महापालिकेची ही सरळ फसवणूक असल्याचे नमूद केले.

त्यानंतर महापौर मंजूषा नागपुरे यांनी शहरातील अशा सर्व मिळकतींचे तातडीने सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी भाडेकराराने दिलेल्या सर्व मिळकतींचे फेरसर्वेक्षण करणार असल्याचे सांगितले. त्यात या मिळकतीचा गैरवापर झाला असल्यास त्या तत्काळ ताब्यात घेण्यात येणार असल्याचे दिवटे यांनी स्पष्ट केले.

# पुण्यात पावसाचा धुमाकूळ; रस्त्यांना नद्यांचे स्वरूप, खडकवासला धरणातून तब्बल ४३,५७१ क्युसेकने विसर्ग सुरु

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर आणि जिल्ह्यात शुक्रवारी (३१ जुलै) पहाटेपासून मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील अनेक भागांत रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले असून वाहतुकीचा वेग मंदावला आहे. सखल भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुसरीकडे, पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे खडकवासला धरण समूहातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू असून खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणे पूर्ण क्षमतेच्या जवळ पोहोचली आहेत. त्यामुळे धरणांमधून टप्प्याटप्प्याने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येत आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने वाढत असल्याने शुक्रवारी दुपारी ३ वाजता खडकवासला धरणाच्या सांडव्यावरील विसर्गात आणखी ३५,५७४ क्युसेक्सची वाढ करण्यात येणार असून एकूण विसर्ग ४३,५७१ क्युसेक्स इतका होणार आहे. पावसाचा जोर आणि धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार हा विसर्ग पुढील काळात पुन्हा कमी किंवा वाढविण्याची शक्यता असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सध्या पाणलोट क्षेत्रात सातत्याने मुसळधार पाऊस सुरू असल्याने खडकवासला धरण समूहातील चारही धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी जमा होत आहे. खडकवासला धरण यापूर्वीच शंभर टक्के भरले असून पानशेत आणि वरसगाव धरणेही पूर्ण क्षमतेच्या जवळ पोहोचली आहेत. टेमघर धरणातील पाणीसाठाही मोठ्या प्रमाणात वाढला असून संपूर्ण धरण समूहात समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. दरम्यान, मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येणार असल्याने नदीकाठच्या सर्व नागरिकांना प्रशासनाने विशेष सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदीपात्रात कोणीही उतरू नये, नदीकाठावरील पाण्याचे पंप, शेतीची अवजारे, जनावरे तसेच इतर साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सखल भागातील नागरिकांना तातडीने सूचना देऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. महापालिका, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि जलसंपदा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणांमधील विसर्गात पुढील काही तासांत आणखी बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# झेंडूचे मळे बहरले; मात्र भावघसरणीने फूल उत्पादक शेतकरी चिंतेत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी–धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात तसेच शिरूर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात झेंडूसह विविध फुलांची शेती सध्या बहरली असून फुलांची तोडणी वेगाने सुरू आहे. मात्र आषाढी एकादशीनंतर बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे फूल उत्पादक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नुकतीच पंढरपूरची आषाढी एकादशी पार पडली. या कालावधीत झेंडूच्या फुलांना दहा किलोमागे १०० ते १२५ रुपये दर मिळत होता. मात्र एकादशीनंतर अवघ्या आठवडाभरातच फुलांचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. सध्या फुलांच्या प्रतवारीनुसार दहा किलोमागे केवळ ६० ते ९० रुपये दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

सध्या मोठे सण–उत्सव नसल्यामुळे फुलांच्या मागणीत अपेक्षित वाढ होण्याची शक्यता कमी असून आगामी काळातही बाजारभावात विशेष सुधारणा होईल, अशी आशा नसल्याचे फूल उत्पादकांनी सांगितले.

यंदा शेतकऱ्यांनी झेंडूबरोबरच ॲस्टर आणि गोंडा या जातींच्या फुलांचीही मोठ्या प्रमाणावर लागवड केली असून ही फुलेही तोडणीस तयार झाली आहेत. मात्र बाजारभावात सुधारणा न झाल्यास फूल उत्पादकांना आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे..

# सह्याद्रीत मुसळधार पाऊस; भाटघर धरणात पाण्याची आवक वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोर । प्रतिनिधी**

भोर तालुक्यासह सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवनावर परिणाम झाला असून नद्या–नाले दुथडी भरून वाहत आहेत. या पावसामुळे भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाली असून धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होत आहे. धरण परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.



धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागल्याने परिसरातील निसर्गरम्य वातावरण अधिक खुलून आले आहे. मात्र, वाढत्या पाण्याच्या प्रवाहामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. हवामान विभागानेही पुढील काही दिवस घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

भाटघर धरण परिसरात पाण्याची वाढती आवक, धरणाची सद्यस्थिती आणि पावसाचा एकूण परिणाम जाणून घेण्यासाठी आमचे प्रतिनिधी संतोष म्हस्के यांनी घटनास्थळावरून ग्राउंड रिपोर्ट सादर केला. त्यांनी धरण परिसरातील परिस्थिती, पाण्याचा वेग आणि प्रशासनाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. दरम्यान, पर्यटकांनी सेल्फी किंवा छायाचित्रांसाठी धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाळुंगे पडवळ येथे गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव, । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ येथील श्री दत्त मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमांना भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा केला.

बुधवारी (दि. २९) सकाळी श्री दत्त महाराजांचा अभिषेक व महापूजा विधिवत पार पडली. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद म्हणून खिचडीचे वाटप करण्यात आले. सायंकाळी ह.भ.प. रामचंद्र चासकर गुरुजी यांचे मार्गदर्शनपर प्रवचन झाले. त्यांनी गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व, अध्यात्मातील गुरूंचे स्थान आणि सदाचाराचे मूल्य यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध गायक तथा अभिनव गंधर्व ह.भ.प. कैलास महाराज पवार यांच्यासह अन्य भजनकारांनी सुमधुर भजनसेवा सादर केली. टाळ–मृदंगाच्या गजरात झालेल्या भजनांनी मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने भजनाचा आस्वाद घेतला.



महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) येथील श्री दत्त मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित भजनसेवेत सहभागी भाविक.

रात्री महाआरतीनंतर श्री दत्त महाराजांची पालखी मिरवणूक गावातून उत्साहात काढण्यात आली. श्री गुरुदेव दत्तच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पालखी सोहळ्यानंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन कै. गोपाळराव भीमाजी आवटे पाटील कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अभय आवटे, अजय आवटे, सागर आवटे, राजेंद्र आवटे, दीपक आवटे, अमित आवटे, मिलिंद आवटे आणि अमोल आवटे यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थ व भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाचा गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# अमनोरा येस फाउंडेशनकडून पारधी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुल; ८ ऑगस्टला डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे, । प्रतिनिधी**

सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपत अमनोरा येस फाउंडेशनने बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुल आणि बंदिस्त प्रेक्षागृहाची उभारणी केली आहे. या क्रीडा संकुलाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते ८ ऑगस्ट रोजी होणार असल्याची माहिती अमनोरा येस फाउंडेशनचे अध्यक्ष तथा सिटी ग्रुपचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी विवेक कुलकर्णी उपस्थित होते.

परमपूज्य भय्यूजी महाराज यांनी स्थापन केलेल्या या आश्रम शाळेची जबाबदारी अमनोरा येस फाउंडेशनने २०१४ मध्ये स्वीकारली. सध्या या शाळेत पारधी समाजातील सुमारे ७५० विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्हॉलीबॉल, हँडबॉल आणि बास्केटबॉलची स्वतंत्र मैदाने तसेच सुसज्ज बंदिस्त



प्रेक्षागृह उभारण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत रोजगारक्षम बनविण्यासाठी इलेक्ट्रिशियन, प्लंबिंग, मोटर मेकॅनिक आणि ब्युटी पार्लर अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच फाउंडेशनच्या ‘स्वयंसिद्ध’ उपक्रमांतर्गत जुन्या साड्यांपासून विद्यार्थिनींकडून कापडी पिशव्या तयार करून घेतल्या जातात. प्रत्येक पिशवीमागे २५ रुपये मानधन देण्यात येते. या उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थिनीच्या खात्यात १० हजार रुपये जमा करण्यात आले असून, ही रक्कम ८ ऑगस्ट रोजी डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

अमनोरा येस फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे. ग्रामीण भागातील गरजू मुलींना शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत तसेच नर्सिंगच्या ४० विद्यार्थिनींना ११ लाख रुपयांची ‘मीरा देशपांडे शिष्यवृत्ती’ देण्यात आली आहे.

याशिवाय ससून रुग्णालयातील मावश्या व ताईंना गेल्या आठ वर्षांपासून ‘मीरा देशपांडे सेवा सन्मान पुरस्कार’ देऊन गौरविण्यात येत असल्याची माहिती अनिरुद्ध देशपांडे यांनी दिली.

# राज्यातील १६ हजार शाळांमध्ये बसणार स्पीकर सिस्टिम; आता शेवटच्या बाकापर्यंत पोहोचणार प्रत्येक शब्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

शाळेतील प्रार्थना, सूचना, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा शिक्षकांचे अध्यापन आता शेवटच्या बाकावर बसलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत स्पष्टपणे पोहोचणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राज्यातील सुमारे १६ हजार शाळांमध्ये स्पीकर सेट (पीए सिस्टिम) उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० यानुसार विद्यार्थ्यांना आनंददायी, उत्साहवर्धक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रमांवर चर्चा झाली. त्यानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना पीए सिस्टिम उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना शिक्षण विभागाला देण्यात आल्या होत्या. शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी या योजनेची उपयोगिता, आवश्यक तांत्रिक मानके आणि निकष निश्चित करून शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील १६ हजार शाळांमध्ये स्पीकर सेट उपलब्ध करून देण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेचे प्रारूप तयार करण्यात येणार असून, शासनाची अंतिम मान्यता घेतल्यानंतर खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे.

या निर्णयामुळे सकाळची प्रार्थना, राष्ट्रगीत, महत्त्वाच्या सूचना, डिजिटल शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आपत्कालीन सूचना प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य होणार आहे. विशेषतः मोठ्या परिसरातील आणि बहुमजली शाळांमध्ये अध्यापन व दैनंदिन शालेय व्यवस्थापन अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## सारांश वृत्त

### उच्च पेन्शनची संधी संपली? ईपीएफओचा स्पष्ट नकार; लाखो कर्मचाऱ्यांच्या आशांवर पाणी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे (ईपीएफओ) मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश कृष्णमूर्ती यांनी उच्च पेन्शनसाठी पुन्हा अर्ज करण्याची कोणतीही नवीन मुदत देण्याचा सरकारचा सध्या कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे उच्च पेन्शनच्या संधीची अपेक्षा ठेवून असलेल्या लाखो कर्मचारी आणि निवृत्तीधारकांच्या आशांवर पाणी फिरल्याची चर्चा सुरू झाली आहे.

रमेश कृष्णमूर्ती यांनी सांगितले की, ईपीएफ योजना २०२६ ही विद्यमान व्यवस्थेत सातत्य राखण्यावर केंद्रित आहे. जवळपास सात दशकांपासून लागू असलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या मूलभूत तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. कर्मचारी आणि नियोक्ता यांचे १२ टक्के योगदान पूर्वीप्रमाणेच कायम असून, १५,००० चे वेतन मर्यादेचे निकषही बदललेले नाहीत.

कामगार संघटनांनी सामाजिक सुरक्षा संहिता आणि नव्या ईपीएफ योजनांमुळे सामाजिक सुरक्षेचे कवच कमी होईल, अशी चिंता व्यक्त केली होती. मात्र ईपीएफओने हे दावे फेटाळत नव्या योजनेत कोणताही मूलभूत बदल नसल्याचे स्पष्ट केले आहे. स्वेच्छेने अधिक भविष्य निर्वाह निधी भरण्याची तरतूदही पूर्वीपासूनच अस्तित्वात असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये वेतनाची अधिक सुसंगत व्याख्या करण्यात आल्याने भविष्यात वेतन मर्यादा बदलण्याचा अधिकार सरकारकडे राहणार आहे. त्यामुळे सध्या नियम कायम असले तरी भविष्यात सरकार कोणते निर्णय घेते, याकडे कर्मचारी, उद्योग क्षेत्र आणि कामगार संघटनांचे लक्ष लागले आहे.

# अण्णाभाऊ साठेंच्या नावाचे नाट्यगृह त्यांचा विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवेल : मुख्यमंत्री फडणवीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : वृत्तसंस्था

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. चिरागनगर येथे त्यांच्या स्मारक व संशोधन केंद्राच्या उभारणीसह भायखळा येथील नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण हा त्या दिशेने महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हे नाट्यगृह त्यांचा विचार आणि साहित्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, बृहन्मुंबईतील लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, महानगरपालिका समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, स्थानिक नगरसेवक यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या चिरागनगर येथे स्मारक उभारण्याच्या मागणीची पूर्तता करत राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक आणि संशोधन केंद्र उभारण्याचे काम सुरू केले आहे. त्याचबरोबर महानगरपालिकेने नूतनीकरण केलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण होणे, ही आनंदाची बाब आहे.

येथे नाट्यप्रयोगांसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मंचाची क्षमता वाढविणे, कलाकारांसाठी सुसज्ज ग्रीनरूमची व्यवस्था करणे, यासह विविध सुधारणा करण्यात आल्याने आता सर्व प्रकारची दर्जेदार नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रम येथे सादर करता येतील. अभिजात कला, संस्कृती आणि साहित्य यांना प्रोत्साहन देतानाच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सांस्कृतिक संधी पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन नाट्यगृहाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी महानगरपालिकेचे कौतुक केले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वास्तववादी असून त्या काळातील सामाजिक परिस्थिती, अन्याय, संघर्ष आणि कामगारांचे जीवन यांचे प्रभावी चित्रण त्यातून दिसून येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांच्या साहित्याची व्याप्ती जागतिक स्तरावर पोहोचली असून त्यांच्या साहित्याचे २७ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची कीर्ती जगभर पोहोचविण्यात त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध ठिकाणी स्मारके -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

क्रांतिसूर्य साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपले आयुष्य शोषित, पीडित, दलित, कष्टकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी समर्पित केले. त्यांच्या साहित्याने आणि शाहिरीने सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली; तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात जनजागृती करून जनसामान्यांना प्रेरित करण्याचे ऐतिहासिक कार्य केले, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

राज्य शासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध ठिकाणी स्मारके उभारली जात असून सांगली जिल्ह्यातील जन्मगाव असलेल्या वाटेगाव येथेही स्मारकाची उभारणी करण्यात येत आहे.

## परदेशातील १४.७६ कोटींच्या ठेवींवर ईडीची जप्ती! अमिरा फूड्स प्रकरणात मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

बासमती तांदूळ उत्पादन आणि विक्री करणाऱ्या अमिरा प्युअर फूड्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीशी संबंधित कथित धनशोधन प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सुमारे १४.७६ कोटींच्या परदेशातील बँक ठेवी तात्पुरत्या जप्त केल्या आहेत. ही रक्कम बँक ऑफ सिंगापूर येथील खात्यांमध्ये ठेवण्यात आली होती.

ईडीच्या माहितीनुसार, ही खाती मुख्य आरोपी करण चनाना, अमिरा फूड्स पीटीई लिमिटेड आणि अनंत्य पीटीई लिमिटेड यांच्या नावावर होती. या खात्यांवरील जप्तीची नोटीस परस्पर कायदेशीर सहाय्य करार (एमएलएटी) अंतर्गत ब्रिटन आणि सिंगापूरमधील संबंधित अधिकाऱ्यांमार्फत तसेच इतर उपलब्ध कायदेशीर माध्यमांतून बजावण्यात आली.

या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) नोंदविलेल्या प्रथम माहिती अहवालाच्या आधारे सुरू करण्यात आला. त्यानंतर निधीचे परदेशात हस्तांतरण, आर्थिक व्यवहार आणि कथित धनशोधनाच्या व्यवहारांचा तपास ईडीने हाती घेतला.

अमिरा फूड्स समूह हा ब्रँडेड पॅकेजबंद अन्नपदार्थ, विशेषतः बासमती तांदूळ उत्पादन व विक्रीसाठी ओळखला जातो. मात्र आर्थिक गैरव्यवहार आणि परदेशातील खात्यांद्वे निधी वळवल्याच्या आरोपांमुळे कंपनी तपासाच्या कक्षेत आली आहे.

ईडीची ही कारवाई परदेशात लपविण्यात आलेल्या कथित अवैध संपत्तीवर कारवाई करण्याच्या प्रयत्नांचा महत्त्वाचा भाग मानली जात आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, आणखी आर्थिक व्यवहार, संबंधित व्यक्ती आणि मालमत्तेबाबत नवी माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ४,००० कोटींची नवी आर्थिक मदत! भूतानमध्ये भारताचा वाढता प्रभाव, चीनसाठी वाढली चिंता?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



भारताने शेजारी राष्ट्र भूतानसोबतची विकास भागीदारी आणखी मजबूत करत ४,००० कोटींच्या सवलतीच्या कर्ज करारावर स्वाक्षरी केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि भूतानचे परराष्ट्र सचिव दाशो पेमा लेक्तुप दोर्जी यांच्या सह-अध्यक्षतेखाली झालेल्या पाचव्या भारत-भूतान विकास सहकार्य चर्चेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीत भूतानच्या तेराव्या पंचवार्षिक विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या भारत-समर्थित प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. भारताने या योजनेसाठी आपली दीर्घकालीन विकास व आर्थिक बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. याशिवाय, दोन्ही देशांनी आरोग्य क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यावरही सहमती दर्शवली. भूतान हा भारताचा सर्वात विश्वासू शेजारी मानला जातो. अशा परिस्थितीत ४,००० कोटींच्या नव्या कर्ज कराराकडे केवळ आर्थिक मदत म्हणून नव्हे, तर हिमालयीन प्रदेशातील भारताच्या रणनीतिक हितसंबंधांना बळकटी देणारे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. विशेषतः चीनचा या प्रदेशातील वाढता प्रभाव लक्षात घेता, भारत-भूतान संबंध अधिक दृढ करण्याला मोठे भू-राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या करारामुळे पायाभूत सुविधा, सामाजिक विकास, आरोग्य आणि इतर विकास प्रकल्पांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर, शेजारी राष्ट्रांशी विश्वास, विकास आणि सहकार्यावर आधारित भारताच्या परराष्ट्र धोरणालाही या निर्णयातून अधिक बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

## पेपरफुटीवर मौन पण फेसबुक पोस्टवर ॲक्शन! प्रतिमा जपण्यात सरकार व्यस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

हैदराबाद पोलिसांनी मेटा इंडियाचे प्रमुख अरुण श्रीनिवास यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्याची घटना केवळ एका सोशल मीडिया प्रकरणापुरती मर्यादित नाही. फेसबुकवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत कथित आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित झाल्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात नेमके कोण जबाबदार, संबंधित सामग्री कधी आणि कशी तपासली गेली, याचा तपास सुरू असला तरी या घटनेमुळे सरकार टीकेला कशा प्रकारे प्रतिसाद देत आहे, याबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

गेल्या काही आठवड्यांत राष्ट्रीय प्रवेश परीक्षांतील प्रश्नपत्रिका गळतीच्या मुद्द्यावर देशभरात मोठे विद्यार्थी आंदोलन झाले. या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामाही झाला. त्याच काळात पंतप्रधानांवरील टीका, व्यंगचित्रे आणि संपादित दृश्यफिती मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्या. या पार्श्वभूमीवर मेटा अधिकाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल होणे हा अपवादात्मक प्रकार मानला जात आहे.



याआधीही माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने पंतप्रधानांची एक पोस्ट काही काळासाठी मर्यादित झाल्यानंतर मेटा अधिकाऱ्यांना स्पष्टीकरणासाठी बोलावले होते. सरकारने यावर्षी माहिती तंत्रज्ञान नियम अधिक कठोर करत न्यायालय किंवा सरकारने बेकायदेशीर ठरविलेली सामग्री अवघ्या तीन तासांत हटविण्याची अट लागू केली आहे. त्यामुळे समाजमाध्यम कंपन्यांवरील आणि त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरील कायदेशीर जबाबदारीही वाढली आहे.

मात्र या सर्व प्रक्रियेत एक मूलभूत प्रश्न कायम आहे. लोकशाही व्यवस्थेत टीका, व्यंग आणि असहमतीला उत्तर अधिक पारदर्शक संवादाने द्यावे की गुन्हे दाखल करून? सरकारने चुकीची माहिती रोखणे आवश्यकच आहे; परंतु त्याचबरोबर नागरिकांच्या प्रश्नांना स्पष्ट, वेळेवर आणि विश्वासार्ह उत्तर देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा प्रत्येक वादग्रस्त पोस्टनंतर कायदेशीर कारवाईचे वातावरण निर्माण झाल्यास, सरकार संवादापेक्षा दडपशाहीचा मार्ग स्वीकारत असल्याची धारणा निर्माण होऊ शकते.

या प्रकरणाचा तपास पुढे काय निष्कर्ष काढतो, हे महत्त्वाचे ठरेल. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे डिजिटल युगात सरकारची विश्वासार्हता केवळ नियम कडक करण्यात नसून, टीकेला संयमाने, तथ्यांच्या आधारे आणि प्रभावी संवादातून उत्तर देण्यात असते.

## रशियातील युद्धात मृत भारतीयांचे मृतदेह डीएनए तपासणीनंतरच सुपूर्द करा; सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

रशिया-युक्रेन युद्धात रशियन सैन्याचा भाग म्हणून लढताना मृत्यू झालेल्या भारतीय नागरिकांच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने मृतदेह कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यापूर्वी डीएनए चाचणी करून ओळख निश्चित करण्याचे, तसेच परराष्ट्र मंत्रालयाने (चएअ) प्रभावित कुटुंबांसाठी विशेष नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश दिले.

हे प्रकरण अशा २६ भारतीय नागरिकांच्या कुटुंबीयांनी दाखल केलेल्या याचिकेशी संबंधित आहे. याचिकेनुसार, हे तरुण नोकरीच्या शोधात रशियात गेले होते. मात्र, त्यांचे पासपोर्ट जप्त करून त्यांना कथितपणे रशियन सैन्यात भरती करण्यात आले आणि युद्धात सहभागी होण्यास भाग पाडण्यात आले. त्यापैकी अनेकांचा युद्धात मृत्यू झाला.

सुनावणीदरम्यान कुटुंबीयांनी असा आरोप केला की, सरकारने त्यांच्याशी पुरेसा संपर्क साधला नाही आणि भारतात परत आणले जाणारे मृतदेह कोणाचे आहेत, याची खात्री करण्यासाठी डीएनए

पडताळणी होत नव्हती. केंद्र सरकारने मात्र काही कुटुंबीयांनी स्वतः डीएनए नमुने देण्यास नकार दिल्याचा दावा केला.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मृतदेहांची ओळख डीएनए चाचणीद्वे निश्चित करूनच ते कुटुंबीयांकडे सुपूर्द करावेत. तसेच रशियन अधिकाऱ्यांकडे भरपाईचा दावा दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि मोफत कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याचेही निर्देश दिले. केंद्र सरकारने न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, रशियन सैन्यात २१९ भारतीय नागरिक होते. त्यापैकी १३९ जणांची सुटका झाली असून, ५१ जण मृत किंवा बेपत्ता आहेत. आतापर्यंत २९ मृतदेह भारतात परत आणण्यात आले आहेत. या प्रकरणाने परदेशात रोजगाराच्या आमिषाने तरुणांना युद्धक्षेत्रात ओढणाऱ्या कथित मानवी तस्करीच्या जाळ्यावर आणि अशा घटनांमध्ये भारतीय नागरिकांच्या संरक्षणासाठीच्या यंत्रणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

## विद्यापीठ कर्मचाऱ्याला बनावट पदवी प्रकरणी पोलीस कोठडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्याची बनावट बी.कॉम. पदवी, गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र तयार करून त्याबदल्यात ७० हजार रुपये स्वीकारल्याच्या आरोपावरून विद्यापीठातील कर्मचाऱ्याला दि. ४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

रमेश दामोदर मुखेकर (वय ४८) हा आरोपी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील कर्मचारी असून, परीक्षा विभागात कार्यरत आहे. त्याने विद्यापीठातील एका विद्यार्थ्याच्या वडिलांना त्यांचा मुलगा बी.कॉम. पदवीधर झाल्याचे भासवून बनावट गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र तयार करून दिले. ही कागदपत्रे खरी असल्याचे भासवून आरोपीने संबंधितांकडून ७० हजार रुपये गुगल-पेच्या माध्यमातून स्वीकारल्याचे तपासात समोर आले आहे. त्याला चतु:शृंगी पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले.

या प्रकरणात आरोपीने बनावट कागदपत्रे तयार करण्यासाठी कोणत्या साधनांचा आणि ठिकाणांचा वापर केला, याचा तपास पोलिसांना करायचा आहे. तसेच त्याने अशाच प्रकारे आणखी किती विद्यार्थ्यांची बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केली आहे, याचाही तपास सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने बनावट बी.कॉम.चे पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका तयार केल्याचे नमूद आहे. ही कागदपत्रे तयार करण्यासाठी वापरलेली साधने हस्तगत करणे तसेच आरोपीच्या मोबाईलमधील माहिती तपासणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले.

## आयपीओ मध्ये सर्वसामान्यांचा पैसा, पण माहितीचा हक्क नाही?; NSE ला सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा, गुंतवणूकदारांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील लाखो सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा पैसा ज्या राष्ट्रीय शेअर बाजारात (NSE) गुंतलेला आहे, त्या संस्थेला माहिती अधिकार (RTI) कायद्याच्या कक्षेत आणण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे जनतेचा पैसा स्वीकारणाऱ्या संस्थेला जनतेपुढे उत्तरदायी असण्याची गरज नाही का? असा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने एनएसईने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला तूर्तास स्थगिती दिली. अंतिम निर्णय होईपर्यंत एनएसईला माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत आणले जाणार नाही.

एनएसईने न्यायालयात मांडलेला युक्तिवाद असा होता की, ती एक खाजगी संस्था आहे. बाजार नियामक सेबी (SEBI) च्या नियंत्रणाखाली काम करत असली आणि सार्वजनिक स्वरूपाची सेवा देत असली, तरी त्यामुळे ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही. हा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या ग्राह्य धरत अंतरिम दिलासा दिला.

मात्र या निर्णयामुळे स व ॅ स ा म ा न य गुंतवणूकदारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. कारण आयपीओ (IPO) असो किंवा शेअर बाजारातील व्यवहार, सामान्य नागरिक स्वतःच्या कष्टाच्या पैशाची गुंतवणूक एनएसईच्या व्यवस्थेवर विश्वास ठेवून करतो. अशा वेळी बाजार व्यवस्थापन, निर्णयप्रक्रिया, तांत्रिक बिघाड, व्यवहारांमधील पारदर्शकता किंवा हितसंबंधांच्या संभाव्य संघर्षासंदर्भातील माहिती मागविण्याचा अधिकार त्याला नसावा का, असा सवाल उपस्थित होत आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाने जुलैच्या सुरुवातीला दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात एनएसई सार्वजनिक हिताचे कार्य करते, देशाच्या वित्तीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे आणि तिच्या निर्णयांचा थेट परिणाम लाखो गुंतवणूकदारांवर होतो, त्यामुळे ती माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत येणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम स्थगितीमुळे या निर्णयाची अंमलबजावणी सध्या थांबली आहे.

देशात कंपन्यांच्या आयपीओंमध्ये लाखो लहान गुंतवणूकदार सहभागी होतात. बाजारातील प्रत्येक व्यवहारावर शुल्क आकारले जाते, गुंतवणूकदार संरक्षण निधी निर्माण केला जातो आणि संपूर्ण व्यवहार सार्वजनिक विश्वासावर चालतो. अशा परिस्थितीत, बाजार चालवणाऱ्या प्रमुख संस्थेकडून माहिती मिळविण्याचा अधिकार मर्यादित राहणे हा पारदर्शकतेच्या तत्त्वाला धक्का मानला जात आहे.

कायदेशीरदृष्ट्या हा अंतिम निर्णय नसला तरी या प्रकरणाने एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे सर्वसामान्यांचा पैसा स्वीकारणाऱ्या संस्थांनी केवळ नफा कमावणाऱ्या खाजगी कंपन्यांप्रमाणे वागावे, की सार्वजनिक उत्तरदायित्वही स्वीकारावे?

आता सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे संपूर्ण वित्तीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे. कारण हा निकाल केवळ एनएसईपुरता मर्यादित राहणार नाही, तर भारतातील वित्तीय संस्थांची पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लाखो किरकोळ गुंतवणूकदारांच्या माहितीच्या अधिकाराची व्याप्ती निश्चित करणारा ठरू शकतो.